# डोंबिवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना


महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २०३ /२०२४ दि. २१/१०/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी,** डोंबिवली वाहतूक उपविभागाचे हद्दीत आगामी विधानसभा निवडणूक २०२४ **चे अनुषंगाने** दि. २२/१०/२०२४ ते दि. ०४/११/२०२४ रोजी प्रत्येक दिवशी सकाळी १०:०० ते १६:०० वाजेपावेतो नेहरू रोडवरील ब्लॉसम इंटरनॅशनल स्कूल, डोंबिवली पूर्व येथे आगामी विधानसभा निवडणूक २०२४ चे १४३ डोंबिवली विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार अर्ज भरणार आहेत. सदर ठिकाणासमोरील रोड अरूंद असून तेथून वाहनांची मोठया प्रमाणात वर्दळ होत असते. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) नेहरू रोडने ब्लॉसम इंटरनॅशनल स्कूल मार्गे ठाकुर्ली ओव्हरब्रिजकडे व सरदार वल्लभभाई पटेल रोडकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **गणेश मंदीर गेट/नेहरू गार्डन** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने गणेश मंदीर गेट येथून उजवीकडे वळून छेडा चौक अथवा नेहरू मैदान मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) ठाकुर्ली ओव्हरब्रिज व नेहरू रोडवरील ठाकुर्ली पूर्व रेल्वे स्टेशन कडून ब्लॉसम इंटरनॅशनल स्कूल मार्गे नेहरू रोडने नेहरू गार्डनकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **जोशी हायस्कूल कट** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने जोशी हायस्कूल येथून डावीकडे वळून सरदार वल्लभभाई पटेल रोडने कानविंदे चौक येथून छेडा रोडने उजवीकडे वळून इच्छित स्थळी जातील.

**पार्किंग –** ब्लॉसम इंटरनॅशनल स्कूल १०० मीटर परिसरात कोणतीही वाहने पार्क करण्यात येणार नाहीत. सदर वाहने बावनचाळ डोंबिवली पश्चिम, नेहरू मैदान, डोंबिवली पूर्व येथे पार्क करावीत.

सदर अधिसूचना दि. २२/१०/२०२४ ते दि. ०४/११/२०२४ रोजी प्रत्येक दिवशी सकाळी १०:०० ते १६:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे

CamScanner

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण, विशेष शाखा, ठाणे
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण
परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण
नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

**प्रत** :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग, पोनि कोळसेवाडी, कल्याण, डोंबिवली, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर
२/– म.न.पा. कल्याण–डोंबिवली यांचे संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.




Scanned with OKEN Scanner